Phone : 07232-240856
Phone : 07232-242456
Fax : 07232-244148

Phone : 07232-243504
Web Site: www.vngmcytl.ac.in
E-mail : deanvngmc@rediffmail.com
vngmcytlstore@gmail.com

# SHRI VASANTRAO NAIK GOVT. MEDICAL COLLEGE, YAVATMAL
# श्री वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,यवतमाळ

जा.क्र.श्रीवनाशावैमय/मध्य.भांडार/होस्टेल मेस/१६५८६/२३, दिनांक :-१२/१२/२०२३

## जाहीर ई-दरपत्रक
## नवीन मुलींचे वसतीगृह क्र.०२ वसतीगृहाकरिता मेस चालविण्याबाबत

श्री वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,यवतमाळ या संस्थेतील नवीन मुलींचे वसतीगृह क्र.०२ वसतीगृहाकरिता मेस ११ महिन्यांच्या करारावर देण्याकरिता अनुभवी महिला परवानाधारक मेस चालकाकडून जाहीर दरपत्रके मागविण्यात येत आहे. दरपत्रक सादर करण्याची अंतिम तारीख दिनांक १९/१२/२०२३ रोजी दुपारी ५.०० वाजेपर्यंत असून दिनांक २१/१२/२०२३ रोजी दुपारी १२.०० वाजता महाविद्यालयाच्या सभागृहात प्राप्त होणा-या दरपत्रकाचे तांत्रिक लिफाफे उघडण्यात येतील. दरपत्रक सादर करणा-या कंत्राटदार किंवा एका प्रतिनिधीस सदर सभेमध्ये उपथित राहता येईल.

### मेस चालविण्यासाठी दरपत्रकाच्या अटी व शर्ती खालील प्रमाणे आहेत.

१) महिला दरपत्रकधारकाचे आस्थापना नोंदणी/दुकान नोंदणी/गुमास्ता नोंदणी प्रमाणपत्र, जीएसटी प्रमाणपत्र, अन्न व औषधी प्रशासनाचे प्रमाणपत्र ई. सादर करण्यात यावे. तसेच दरपत्रकधारकास पुर्वानुभव असणे आवश्यक आहे. (त्यासंबंधीचे दस्तावेज सादर करण्यात यावे) अन्यथा दरपत्रक स्विकारण्यात येणार नाही व अशा प्रकारचे दरपत्रक रद्द करण्यात येईल.

२) कंत्राट संबंधीच्या असलेल्या खालील सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबत प्रत्येक पानावर सही करुन सादर करावा लागेल.

३) उपरोक्त सर्व बाबींचा समावेश असलेला लिफाफा तयार करुन त्यावर तांत्रिक लिफाफा असे नमुद करण्यात यावे. तसेच दरासंबंधीचा कागद वेगळया लिफाफ्यात बंद करुन त्यावर दराचा लिफाफा व कंत्राटदराने स्वतःचे नांव नमुद करुन झालेले दोन्ही लिफाफे एका मोठया लिफाफ्यात बंद करावे लागतील व त्यावर ठळक अक्षरात जुने एच.ओ. वसतीगृहातील मेसकरिता दरपत्रक असे नमुद करुन त्यावर स्वतःचे नांव, संपुर्ण पत्ता व संपर्क क्रमांक लिहून व मोहोरबंद करुन दि.१९/१२/२०२३ रोजी दुपारी ५.०० वाजेपर्यत महाविद्यालयाच्या आवक-जावक विभागाकडे पोहोचवावे लागतील. उशिराने प्राप्त होणारी दरपत्रके स्विकारण्यात येणार नाही.

४) जे कंत्राटदार या संस्थेत मेस चालवित आहेत अशा सर्वांना या दरपत्रक प्रक्रियेत भाग घेता येणार नाही.

५) यापुर्वी जे कंत्राटदार या संस्थे अंतर्गत मेस व उपहारगृहाचे थकबाकीदार (डिफॉल्टर) आहेत असे सर्व कंत्राटदार सदर दरपत्रक भरण्यास अपात्र असतील.

६) दि२१/१२/२०२३ रोजी सकाळी १२.०० वाजता मेस समितीसमोर दरपत्रकाचे तांत्रिक लिफाफे उघडण्यात येतील. त्यांच्या पडताळणीनंतर दराचे लिफाफे उघडण्याबाबत निर्णय घेण्यात येईल. किंमतीचे लिफाफे उघडण्यापुर्वी खाद्य पदार्थाचे आकारमान/वजन/प्रमाण ईत्यादीचे खात्री करुन घेण्याची आवश्यकता वाटल्यास त्यांचे नमुने मागविण्याचा अधिकार मेस/उपहारगृह समितीकडे राखुन ठेवलेला आहे.

७) दरपत्रकाची बयाना रक्कम म्हणून रुपये ५०,०००/- अक्षरी (पन्नास हजार) चा धनाकर्ष (डि.डि.) अधिष्ठाता श्री वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,यवतमाळ यांचे नांवे स्विकृत कंत्राटदारास (न्युनतम ठरणारे) ०२ दिवसात सादर करावे लागेल. (धनादेश चालणार नाही)

### कंत्राटा संबंधीच्या अटी व शर्ती

१) मेस समितीमार्फत निश्चित करण्यात आलेली जागा निवड झालेल्या कंत्राटदारास उपलब्ध करुन देण्यात येईल. त्याचे मासिक शुल्क सार्वजनिक बांधकाम विभाग यांचेकडून जागेचे भाडे आकारणी होईस्तोवर रु.२५००/- अक्षरी (दोन हजार पाचशे) व विद्युत विभागाकडून वेगळे विजेचे मिटर लाऊन देईपर्यंत मासिक विज शुल्क रु.२५००/- अक्षरी(दोन हजार पाचशे)तसेच पाण्याच्या बीलापोटी मासिक शुल्क रु.५००/- असे एकूण रु.६०००/- (पाच हजार

पाचशे) मासिक शुल्क आकारण्यात येइल. ज्याचा भरणा रोखपाल, श्री व.ना.शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,यवतमाळ यांचेकडे दर महिन्याला जमा करुन रितसर पावती घ्यावी लागेल.

२) कंत्राटाची हमी म्हणून मान्य होणा-या कंत्राटदारास रु.५०,०००/- अक्षरी (पन्नास हजार) सुरक्षा ठेव जमा करावी लागेल. जी कंत्राटाचा कालावधी पुर्ण झाल्यावर कंत्राटदारास परत करण्यात येईल.

३) कंत्राटाचा कालावधी हा ११ महिन्याचा राहील. त्यानंतर कंत्राट पुढे चालु ठेवावा किंवा नाही याबाबत मेस/ उपहारगृह समितीने घेतलेला निर्णय अंतिम राहील व तो कंत्राटदारास बंधनकारक राहील. पुढे कंत्राट चालु ठेवावयाचा झाल्यास तो देखील ११ महिन्यांकरिता नवीन करार करुन ठेवण्याचा अधिकारी मेस/उपहारगृह समितीकडून राखुन ठेवलेला आहे. एकाच कंत्राटदाराला सलग ०३ वेळा कंत्राट मिळाल्यास त्यानंतर नव्याने परत दरपत्रक प्रक्रिया राबविण्यात येईल.

४) करार कालावधीत कंत्राटदाराने जागेचा गैरवापर अथवा विद्यार्थी, डॉक्टर किंवा कर्मचा-यांशी गैरव्यवहार केल्याचे निदर्शनास आल्यास कोणतीही पुर्वसुचना न देता कंत्राट रद्द करण्याचा अधिकार समितीकडे राहील.

५) कंत्राटदारामार्फत पुरविण्यात येणारे खाद्य पदार्थ निकृष्ट दर्जा आढळल्यास व तशी तक्रार किंवा इतर कोणत्याही सबळ कारणास्तव एक महिन्याची पुर्व सुचना देऊन कंत्राट संपुष्टात आणण्याचा अधिकारी मेस/उपहारगृह समितीकडे राहील.

६) मेस कामकाजावर व दर्जावर नियंत्रण ठेवण्याचे काम मेस/उपहारगृह समिती करेल.

७) मेस मधील स्वयंपाकगृहाकरिता लागणारे फर्निचर व इतर सामग्री ही आदेश प्राप्त होणा-या कंत्राटदारास स्वतः आणावी लागेल.

८) मेसची जागा व सभोवतालचा परिसर स्वच्छ ठेवण्याची व शिळे अन्न, कचरा व घाण संस्थेच्या परिसरातुन दुर नेऊन योग्य पध्दतीने विल्हेवाट लावण्याची जबाबदारी कंत्राटदाराची राहील.

९) विद्यार्थी, डॉक्टर व कर्मचारी यांना उधारीत माल दिल्यास त्याची संपुर्ण जबाबदारी ही संबंधित कंत्राटदाराची राहील. त्यांचे वसुलीकरिता मेस/उपहारगृह समिती व अधिष्ठाता कोणतीही मदत करणार नाही.

१०) पिण्याचे पाणी साठविण्याकरिता लागणा-या टाकीची व्यवस्था ही कंत्राटदारास स्वतंत्र करावी लागेल. तसेच पाण्याचे शुध्दीकरण यंत्र (वॉटर प्युरिफायर) व वाटर कुलर यांचे वेळोवेळी मेन्टेनन्स करण्याची सर्वस्वी जबाबदारी कंत्राटदाराची राहील.

११) सिलेंडरचा वापर करतांना कमर्शियल सिलेंडरचाच वापर करावा लागेल व त्याची व्यवस्था कंत्राटदारास स्वतःचे जबाबदारीवर करावी लागेल.

१२) दरपत्रक अर्जामध्ये दर्शविल्याप्रमाणे दररोज सकाळी व संध्याकाळी जेवण, नास्ता दरपत्रकात नमुद केलेल्या किंमतीनुसारच द्याव्या लागतील.

१३) विद्यार्थ्यांना स्वच्छ व शुध्द पिण्याच्या पाण्याची व्यवस्था कंत्राटदारास करावी लागेल.

१४) अन्नातुन विषबाधा किंवा आरोग्यास अपाय झाल्यास संपुर्ण जबाबदारी कंत्राटदाराची राहील. सदर नुकसानीची भरपाई कंत्राटदाराकडून केल्या जाईल.

१५) मेस मध्ये आग व शॉर्टसर्किट ईत्यादी मुळे दुर्घटना होणार नाही, याची पुर्ण खबरदारी कंत्राटदारास घ्यावी लागेल. काही दुर्घटना झाल्यास नुकसान भरपाई कंत्राटदाराकडून करण्यात येईल.

१६) या व्यवसायाचे आयकर/जीएसटी कर व शासनाचे लागु असलेले कर भरण्याची जबाबदारी कंत्राटदाराची राहील. आवश्यकता भासल्यास त्याची प्रत या कार्यालयास उपलब्ध करुन द्यावी लागेल.

१७) वरील दरपत्रकात वेळेवर फेरबदल करण्याचे किंवा दरपत्रक रद्द करण्याचे अधिकारी मेस/उपहारगृह समिती यांना राहतील.

१८) कंत्राटदारास मेस/उपहारगृहाकरिता हस्तांतरीत करण्यात आलेल्या इमारतीचा रितसर ताबा घ्यावा लागेल व परत सोडतांना रितसर ताबा द्यावा लागेल. इमारतीचे नुकसान झाल्यास नुकसानाची भरपाई कंत्राटदाराकडून घेण्यात येईल.

१९) मेसच्या सभासदाबाबत काही तक्रार असल्यास त्याची तक्रार मेस समिती अथवा वार्डन मार्फत मा.अधिष्ठाता यांचेकडे करता येईल.

२०) कंत्राटदारास मेस व्यतिरिक्त कोणताही व्यवसाय किवा घरगुती मेस चालविता येणार नाही.

२१) मेसच्या मेनु व्यतिरिक्त अतिरिक्त पदार्थ ई. मागणी केल्यास त्याची व्यवस्था ठेवण्यात यावी व त्याचे दर स्वतंत्रपणे फलकावर लावण्यात यावे.

२२) मेस मध्ये काम करणा-या कर्मचा-याचा विद्यार्थी व डॉक्टरांना त्रास होणार नाही याची सर्वस्वी जबाबदारी कंत्राटदाराची राहील.

२३) सकाळी नास्त्याची वेळ ६.३० ते ९.३० राहील व जेवणाची वेळ दु.१२.०० ते ३.०० व संध्याकाळी नास्त्याची वेळ ४.०० ते ६.०० तसेच रात्रीच्या जेवणाची वेळ ७.०० ते ९.०० राहील. रात्री मेस कर्मचारी उपलब्ध राहील. आठवडयातुन ०१ दिवस बदल व ०१ दिवस फिस्ट (गोडजेवण/नॉनव्हेज) देणे बंधनकारक राहील. तसेच सणाच्या दिवशी सुध्दा फिस्ट देणे आवश्यक राहील.

२४) दररोज मेस मध्ये तयार होणारा नास्ता, जेवण प्रथमतः वसतीगृह प्रमुख किंवा नेमुन दिलेले प्रतिनिधी यांना चाचणीकरिता उपलब्ध करुन द्यावे लागेल. तशी नोंदवही ठेवुन त्यामध्ये त्याची नोंद घेऊन चाचणी करणा-या प्रतिनिधीचे नांव, शेरा व स्वाक्षरी घ्यावी लागेल. अशा चाचणीमधील सुचनांचे पालन करण्याची जबाबदारी संबंधित कंत्राटदाराची राहील. तसेच वारंवार प्रतिकुल शेरे प्राप्त झाल्यास ताबडतोब कंत्राट संपुष्टात आणण्याचा अधिकारी मेस/उपहारगृह समितीला राहील.

२५) कुठल्याही विद्यार्थीनी किंवा डॉक्टर यांचे रुमवर थाली पाठविल्या जाणार नाही.

२६) **मेस चालकाची निवड ही जेवणाच्या शुल्क आधारे करण्यात येईल**. तसेच उपहारगृहातील पदार्थाचे शुल्क तुलनात्मक तक्त्यातील न्युनतम दर किंवा समिती निश्चित करुन देईल त्या दराने निश्चित करण्यात येईल.

२७) कंत्राटदाराला मेस/उपहारगृहामध्ये कायम वास्तव्य करता येणार नाही. तसेच महिला कामगारांनाच कामावर ठेवावे लागेल. कुठल्याही परिस्थितीत बाल कामगार ठेवता येणार नाही.

२८) रोजच्या जेवणामध्ये दोन भाज्या, पोळी, वरण, भात या व्यतिरक्त चटणी, लोणचे, कांदा व लिंबु यांचा समावेश असावा.

२९) सभासदाची मेसबाबत काही तक्रार असल्यास ती नोंदविण्याकरिता मेसमध्ये तक्रार पुस्तिका ठेवण्यात यावी व ती वसतीगृहाचे वार्डन यांना वेळोवेळी दाखविण्यात यावी.

३०) वरील सर्व अटी व शर्ती मान्य असल्याचे रुपये १००/- स्टॅम्प पेपरवर नमुद करुन वरील करारपत्र स्वाक्षरी व शिक्का व दोन साक्षीदाराच्या स्वाक्षरीसह सादर करणे आवश्यक आहे. त्याशिवाय मेस/उपहारगृह जागेचा ताबा आपणास देण्यात येणार नाही.

## दराबाबतची माहिती

दरासंबंधी व आकारमान/वजन/प्रमाण ईत्यादीची सदरहु माहिती स्वतंत्र लिफाप्यात बंद करुन उपरोक्त सुचनेप्रमाणे सादर करण्यात यावी. तांत्रिक लिफाप्यात सदरहु माहिती सादर करण्यात येऊ नये.

## नवीन मुलींचे वसतीगृह क्र.०२ मेसमधील जेवणाचे दर

| अ.क्र | विवरण | दर |
|---|---|---|
| १ | मासिक शुल्क | |
| २ | १५ दिवसाचे शुल्क | |
| ३ | एक वेळच्या जेवणाचे शुल्क | |
| ४ | गेस्ट शुल्क | |
| ५ | राईस प्लेट शुल्क | |

सकाळच्या जेवणामध्ये एक भाजी, वरण,चपाती,भात,चटणी,पापड,लोणचे,कांदा,लिंबु व सलाद यांचा समावेश असावा. संध्याकाळच्या जेवणामध्ये एक भाजी, वरण, चपाती, भात, चटणी, पापड ई. चा समावेश असावा.

कोणतीही भाजी, कडधान्य भाजी केलेल्या दिवसानंतर ०४ दिवसांपर्यंत करता येणार नाही. तसेच जेवणामध्ये वेगवेगळया पदार्थांचा समावेश असावा.

मेस/उपहारगृह समितीची परवानगी घेऊन त्यांच्या सुचनेनुसार बदल म्हणून उएखाद्या दिवशी मेनुमध्ये बदल करता येईल. म्हणजे खिचडी, भाकरी बेसन ई. तसेच वार्डन यांचेशी एक आठवडयाचे मेनुचे वेळापत्रक तयार करुन घ्यावे लागेल व त्यानुसार जेवण उपलब्ध करुन देणे बंधनकारक राहील.

**नवीन मुलींचे वसतीगृह क्र.०२ वसतीगृहाकरिता उपहारगृहाचे दर**

| विवरण | परिमाण | | दर |
|---|---|---|---|
| चहा | अर्धा कप | (७५ मि.ली.) | |
| | पुर्ण कप | (१५० मि.लि.) | |
| कॉफी | अर्धा कप | (७५ मि.लि.) | |
| | पुर्ण कप | (१५० मि.लि.) | |
| दुध | अर्धा कप | (७५ मि.लि.) | |
| | पुर्ण कप | (१५० मि.लि.) | |
| ब्रेड बटर | ०२ नग | २ ब्रेड व १० ग्रॅम बटर | |
| टोस्ट बटर | ०२ नग | ०२ टोस्ट व १० ग्रॅम बटर | |
| ब्रेड जाम | ०२ नग | ०२ ब्रेड व जाम | |
| समोसा | ०२ नग | प्रतिनग ६० ग्रॅम व टोमॅटोसॉस | |
| कचोरी | ०१ नग | ४० ग्रॅम व टोमॅटोसॉस | |
| आलुबोंडा | ०१ नग | ५० ग्रॅम व टोमॅटोसॉस | |
| पोहे | एक प्लेट | १०० ग्रॅम | |
| उपमा | एक प्लेट | १५० ग्रॅम | |
| साबुदाना उसळ | एक प्लेट | १५० ग्रॅम | |
| साबुदाणा वडा | ०१ नग | १०० ग्रॅम | |
| अंडा ऑम्लेट | ०१ अंडयाचे | — | |
| | ०२ अंडयाचे | — | |

वरील पदार्थासाठी लागणारी बाहेरुन विकत घेतलेली विविध सामुग्री ही चांगल्या व दर्जेदार प्रतीची असावी. उदा. चहापत्ती, कॉफी, दुध, ब्रेड, सॉस, पाव व इतर मसाल्याचे पदार्थ ईत्यादी.

अधिष्ठाता
श्री व.ना.शासकीय वैद्यकीय महाविद्यालय
यवतमाळ